वस्त्रोद्योग संचालनालयाचे नाव वस्त्रोद्योग आयुक्तालय करण्याबाबत व त्या अनुषंगाने सबंधित पदांच्या पदनामात बदल करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३२/टेक्स-२
१६ वा माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २४ एप्रिल, २०१९

<u>वाचा :-</u> १) शासन निर्णय, कृषी व सहकार विभाग क्र. सीएलएस-१९७१/२३२२८-सी(२)(१), दिनांक ३० ऑक्टोबर, १९७१
२) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्र. एचपीएल१०८९/२१००२/सीआर २१३/२३सी, दिनांक १ फेब्रुवारी, १९९०
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. संकीर्ण-१०२००४/प्र.क्र. २५०/टेक्स-२, दिनांक ७ मार्च, २००५
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.६/टेक्स-५, दि. १५ फेब्रुवारी, २०१८

<u>प्रस्तावना</u> :-

वरील वाचा क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ जाहीर करण्यात आलेले आहे. सदर धोरणांतर्गत प्रभावी प्रशासनाच्या दृष्टीकोनातून रोहयो आयुक्त, कौशल्य विकास आयुक्त, पशुधन विकास आयुक्त यांच्या धर्तीवर वस्त्रोद्योग संचालनालयाचे नाव वस्त्रोद्योग आयुक्तालय करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

वरील अनुषंगाने वस्त्रोद्योग संचालनालयाचे नाव वस्त्रोद्योग आयुक्तालय असे करुन त्या कार्यालयातील संचालक पदाचे नाव आयुक्त व त्यानुसार पदोन्नती साखळीतील इतर अधिकाऱ्यांचे पदनामसुद्धा संचालक ऐवजी आयुक्त या शब्दाद्वारे बदलण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने वस्त्रोद्योग संचालनालयाचे नाव वस्त्रोद्योग आयुक्तालय असे करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कार्यालयातील खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांच्या पदनामात बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

अ. क्र.	सध्याचे पदनाम	नवीन पदनाम
१.	संचालक (वस्त्रोद्योग)	आयुक्त (वस्त्रोद्योग)
२.	सहसंचालक (वस्त्रोद्योग)	सह आयुक्त (वस्त्रोद्योग)
३.	उपसंचालक (वस्त्रोद्योग)/ प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग)	उप आयुक्त (वस्त्रोद्योग)/ प्रादेशिक उप आयुक्त (वस्त्रोद्योग)
४.	सहायक संचालक (वस्त्रोद्योग)	सहायक आयुक्त (वस्त्रोद्योग)
५.	सहायक संचालक (तांत्रिक)	सहायक आयुक्त (तांत्रिक)

२. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेने त्यांचे अनुक्रमे, अनौपचारिक संदर्भ क्र.११३८/का.१२, दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ आणि अनौपचारिक संदर्भ क्र.२७९/ २०१८/सेवा-९, दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०४२४१७०८४२७६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Baliram Balu Chavhan

Digitally signed by Baliram Balu Chavhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e273e36b99be5b14489b31a9c2811b8b229d82eaf6b80e127184b883aeff30f8, serialNumber=d5d3bee863c8e1cd0b4387e83a935e72bfd969e5d5643a5a628f7516c192e220, cn=Baliram Balu Chavhan
Date: 2019.04.24 17:11:18 +05'30'

(ब. बा. चव्हाण)
सह सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा याचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद याचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७) सर्व प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व जिल्हाधिकारी
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
११) महालेखापाल (लेखापरीक्षका), मुंबई / नागपूर.
१२) महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
१३) सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५) अवर सचिव (१७-सी) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) कक्ष अधिकारी (रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
१९) सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासन भवन, मुंबई.
२०) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती (टेक्स-२).